**जगदेवी कलकेरी**



जगदेवी सोलापूर शहरातील एका कामगार वसाहतीतील भागात आपल्या परिवारासह राहते. जगदेवीच्या परिवारात पती एक मुलगा एक मुलगी आहे. जगदेवी कुटुंब चालविण्यासाठी वेगवेगळ्या ठिकाणी काम करीत आली आहे. काही वेळा काम मिळत नाही काही वेळा कमी कलावधीसाठीची कामे करावी लागते. कोरोंना कालावधीत जगदेवीच्या हाताला काम नव्हते तिला नेहमी वाटत होत की माझ्याकडे एखादे कौशल्य असते तर मी उदरनिर्वाहाचे साधन म्हणून त्याचा वापर करू शकले असते. स्वावलंबी कुटुंब व्हावे म्हणून ती सतत प्रयत्न करीत असते. मुलाचे शिक्षण आणि घर चालविण्यासाठी हातभार लागावा म्हणून जगदेवी सतत काहींना काही काम मिळविण्याचा प्रयत्न करीत असते. पतीच्या पगारावर घर चालणे अशक्य होते. पती-पत्नींनी मिळून काम केले तर एकावर घर चालविण्याचा भर सहन करावा लागणार नाही अस जगदेवीचे मत आहे.

जगदेवीला कोरोंना काळात वाटत होते जर, आपल्याला गाडी चालविता येत असती तर आपणही काहीतरी काम करू शकलो असतो. गाडी चालवता येत नसल्याने या कामाबाबत जगदेवी विचार करू शकत नव्हती.

जगदेवीला वात्सल्य ट्रस्ट मुंबई व सारथी युथ फौंडेशनच्या माध्यमातून ड्रायव्हिंग प्रशिक्षण दिले जात असल्याची माहिती मिळाली. वात्सल्य ट्रस्ट मुंबई व सारथी युथ फौंडेशनच्या सहकार्याने शिवधन ड्रायव्हिंग स्कूलमध्ये जगदेवीने रिक्षा चालविण्याचे प्रशिक्षण पूर्ण केले. लर्निंग व पक्के लायसन्स घेऊन आपल्या रिक्षा चालविण्याच्या कामाला सुरुवात केली.

जगदेवी सांगते, "वात्सल्य ट्रस्ट मुंबई व सारथी युथ फौंडेशनच्यामाध्यमातून राबविलेल्या या ड्रायव्हिंग प्रशिक्षणामुळे रिक्षा ड्रायव्हिंगचे कौशल्य प्राप्त करता आले. भाड्याची रिक्षा घेऊन जेव्हा पहिली रक्कम हातात आली तेव्हा खूप आनंद झाला आणि वाटले स्वत:च्या सक्षमीकरणा सोबतच कुटुंबाचे सक्षमीकरण मला करता येईल. सध्या मी कर्ज काढून स्वत:ची रिक्षा घेण्याच्या तयारीत आहे. अधून मधीन भाडे तत्वावर रिक्षा चालवते. माझ्या रोजगारात भर पडून माझ्या कुटुंबाला मदत होत आहे. वात्सल्य ट्रस्ट मुंबई व सारथी युथ फौंडेशन आपले खूप खूप आभार!"




DRIVE WITH
सारथी युथ फौंडेशन, सोलापूर.
आणि
वात्सल्य ट्रस्ट मुंबई
यांच्या संयुक्त विद्यमाने
वाहन चालक प्रशिक्षण